नियमीत फौ. ख. क्र. ३२/२०१९
सरकार -वि.- राजेंद्र व इतर
नि.क्र. ७५.

**उलट तपास आरोपीतर्फे त्यांचे वकील श्री भोंबे यांचे मार्फत**

१. पोलिसांनी माझे बयान दि.२७.११.२०१८ रोजी घेतले होते. मी पोलिसांना बयान देताना ''त्यावेळी ट्रक्टरने चना पेरणी सुरु असताना राजेंद्र शिंदे व नैना राजेंद्र शिंदे तेथे आले व त्यांनी माझ्या व माझ्या पत्नीसोबत भांडण सुरु केले. त्यावेळी राजेंद्र शिंदे याच्या हातामध्ये लोखंडी पाईप होता. त्यावेळी मी धुऱ्यावर असताना राजेंद्र धुऱ्याजवळ आला व त्याने मला लोखंडी पाईपने हातावर, बगलेमध्ये, कमरेवर मारहाण केली. त्यावेळी मी माझी मोपेड गाडीजवळ गेल्यावर नैना शिंदे हिने माझी कॉलर पकडली. मी कसे तरी सोडवून मी माझ्या शेतामध्ये गेलो. त्यावेळी मी माझ्या पत्नीकडे गेलो असता अर्धा तासानंतर पवन जगताप व त्याच्यासोबत एक व्यक्ती माझ्या शेतावर आले. त्यांनी त्यांची गाडी रस्त्यावर ठेवली व माझ्याकडे शेतात पळत आले. त्यावेळी पवन जगताप याने मला पटकून पटकून मारले. त्यावेळी मी पेरणी आटोपून धुऱ्याकडे ट्रॅक्टरने गेलो असता पवन जगताप यांच्यासोबत आलेल्या अनोळखी इसमाने मला सांगितले की, समझोता करायचा आहे काय? '' ही बाब सांगितली नव्हती.

२. मी पोलिसांना बयान देताना ''तो अनोळखी व्यक्ती मला समझोता करायचा आहे असे सांगितल्यानंतर मी त्याला सांगितले की, ठीक आहे ही केस इथेच मिटवून घेऊ पोलीस स्टेशनला काय जायचे, त्यावेळी तो मला म्हणाला की, ही मारामारीची केस नाही शेतीची केस मिटवून टाकू. त्यानंतर पेरणी करुन मी रस्त्यावर जाण्याकरिता निघालो असता राजेंद्र शिंदे, नैना शिंदे व तो अनोळखी इसम पोलीस स्टेशनला जायला निघाले तसेच पवन जगताप कुठे तरी निघून गेला'' ही बाब सांगितली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेली कुठलीही घटना घडलेली नाही म्हणून मी ती पोलिसांना बयान देताना सांगितले नाही.

३. तथाकथीत घटनेच्यावेळी मी, माझी पत्नी व ट्रॅक्टर चालविणारा इसम हजर होते. असे घडले होते की, मी फोन करुन काही व्यक्तींना बोलाविले होते. त्या व्यक्तींचे नावे गजानन नत्थूजी गोंगल यांना फोन केला त्यांनी सुधाकर गोरले, किसन वांढरे यांना आणले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतः फोन करुन त्यांना समझोता

करणेकरिता बोलाविले होते. पोलिसांनी मला माझे बयान वाचून दाखविले होते. माझ्या बयानामध्ये ''मी फोन करुन गावातील गजानन गोंगल, सुधाकर गोरले व किसनजी वांढरे यांना समझोता करणेकरिता बोलाविले होते'' हे लिहीलेले बरोबर नाही. मी त्या लोकांना भांडण वाढू नये म्हणून बोलाविले होते. मी पोलिसांना बयान देताना भांडण वाढू नये म्हणून लोकांना बोलाविले होते ही बाब सांगितली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या बयानामध्ये काय लिहीले आहे हे मला माहीत नाही. पोलिसांनी मला विचारुन माझे बयान स्वतः लिहीले. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी माझ्या बयानातील काही भाग मला वाचून दाखविला नव्हता. असे होऊ शकते की, पोलिसांनी जो भाग मला वाचून दाखविला नाही तो त्यांच्या मनाने लिहीलेला असेल. पोलिसांनी मला बयान नोंदविण्याकरिता सूचना पत्र दिले नव्हते.

**मध्यान्हाची वेळ झाल्यामुळे उलट तपास तहकुब करण्यात येते.**

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक १६.१२.२०२५

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

<u>**मध्यान्हानंतर उलट तपास पुन्हा सुरु**</u>

४. माझ्या शेतापासून सालेभट्टी गाव १ कि.मी. अंतरावर आहे. सालेभट्टीवरुन माझ्या शेतावर पायी निघाल्यास १५ मिनीटे लागतात. तथाकथीत घटना ही गावातील लोकांच्या आल्यानंतर त्यांच्या समक्ष घडली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी चना पेरत असताना राजेंद्र शिंदे, नैना शिंदे यांनी मला मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. मला चार भाऊ आहेत. रमेश शिंदे माझे भाऊ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, रमेश शिंदे याची शेती राजेंद्र शिंदे ठेक्याने करतात. हे म्हणणे खरे नाही की, मी पेरणीकरिता ट्रॅक्टर रमेश शिंदे यांच्या शेतातून घेऊन जात होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी ती शेती राजेंद्र शिंदे ठेक्याने करीत असल्याने त्याने मला ट्रॅक्टर नेण्यास मनाई केली. माझ्या ट्रॅक्टर चालकाचे नाव राहूल धोपटे होते. हे म्हणणे खरे नाही की, नैना शिंदे यांनी राहूल धोपटे याला ट्रॅक्टर घेऊन जाण्यास मनाई केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी मनाई

केल्यामुळे मी बैलबंडीची उभारी घेऊन राजेंद्र शिंदे व नैना शिंदे यांना मारहाण केली. हे म्हणणे खरे आहे की, राजेंद्र शिंदे व नैना शिंदे हे प्रथम फिर्याद देण्यास गेले होते. माझे शेत हे दोन एकरच्या जवळपास आहे. माझ्या शेताची पेरणी १२.३० वा. सुरु झाली व ३.३० वाजताच्या दरम्यान संपली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी तथाकथीत घटना घडल्यानंतर संपूर्ण शेताची पेरणी केली. हे म्हणणे खरे आहे की, मी घटना घडल्यानंतर पोलीस स्टेशनला तक्रार केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांनी मृत्यू पत्रान्वये शेती राजेंद्र शिंदे व इतर भावांना दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मला माझ्या वडीलांनी सालेभट्टी येथील गट क्र.२०० दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या मृत्यू पत्रामुळे माझे व आरोपीमध्ये बोलणे चालणे बंद होते. पवन जगताप हा घटनेच्यावेळी उमरेड येथे राहत होता. उमरेडवरुन सालेभट्टीला येणेकरिता अर्धा तपास लागतो. पवन जगताप हा सरकारी कर्मचारी आहे. हे म्हणणे खरे नाही की, पवन जगताप घटनेच्यावेळी हजर नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, पवन जगताप सरकारी कर्मचारी असल्यामुळे मी जाणूनबूजून त्याचे नाव सदर प्रकरणात टाकले. मी पोलिसांना बयान देताना पवन जगताप याने माझ्या पत्नीचे ब्लाऊज फाडले व काळी गळसोडी तोडली हे सांगितले होते. तसे माझ्या बयानात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पवन जगताप याने माझ्या पत्नीचे ब्लाऊज फाडले व काळी गळसोडी तोडली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्या व माझ्या पत्नी विरोधी तक्रार दिल्यामुळे मी व माझ्या पत्नीने आरोपींविरुद्ध खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,<br>
माझे समक्ष,

दिनांक १६.१२.२०२५

स्वा/-<br>
(एस. जे. लाड)<br>
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,<br>
भिवापूर.